# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८ (१) अन्वये झालेली तक्रार

## तक्रार क्रमांक : १२७९/२०२२

**तक्रारकर्ता,** श्री.दिनेश खारे,
रा.शॉप नं.०८, राजक्ष्लमी कॉ.ऑप.हौ.सोसा.,लि,
श्रीनगर, वागळे इस्टेट, ठाणे (प) जि.ठाणे ४०० ६०४.

विरुध्द

विद्यमान जन माहिती अधिकारी तथा सह जिल्हा निबंधक वर्ग-२, ठाणे शहर, सह जिल्हा निबंधक यांचे कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालय इमारत, कोर्ट नाका, ठाणे (प), जि.ठाणे ४००६०१.

तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सह जिल्हा निबंधक वर्ग-२, ठाणे शहर, सह जिल्हा निबंधक यांचे कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालय इमारत, कोर्ट नाका, ठाणे (प), जि.ठाणे ४००६०१.

**तक्रार सुनावणीचा दिनांक : ४/१२/२०२५**

| माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक | जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज प्राप्त दिनांक | प्रथम अपिल आदेश प्राप्त दिनांक |
|---|---|---|---|
| १०/१/२०२२ | ---- | ११/२/२०२२ | २८/२/२०२२ |

तक्रारकर्ता यांनी दि.२३/५/२०२२ रोजीच्या अर्जान्वये " माहिती दिली नाही " असे कारण नमूद करुन कलम १८(१) अन्वये तक्रार अर्ज दाखल केला आहे. सदर तक्रार अर्जावर आज दिनांक ४/१२/२०२५ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस उभयपक्ष अनुपस्थित आहेत. (कार्यालयाद्वारे नोटीस पाठविलेबाबतचे ट्रॅकिंग रिपोर्ट सादर करण्यात आले असून, ते नस्तीसोबत अभिलेखावर ठेवण्यात आलेले आहेत)

तक्रारकर्ता यांनी मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्राणे माहिती मागितली आहे.

" *a) Adj-185/2021/14569/2021 dated 07/09/2021 In the matter of deemed conveyance of Rajlaxmi CHS ltd, Shreenagar, Thane w. b) Order no.185/21/20882-83 dated 16/12/2021. Copy attached. 1.Provision under the prevailing law/s land, under which the stamp duty demanded second time on the document which already are adjudicated and stamp duty paid uner amnesty Scheme of 1995. 2.powers conferred to the appropriate authority to call for the payment of stamp duty second time, on which duty is already paid. 3.certified true copies of the documents provided by the said society concluding that the stamp duty on the shop no.8 is not paid. 4.certified true copy of the evidences, you relied upon to raise demand of stamp duty, ignoring the stamp duty paid earlier in amnesty scheme. Also please provide day to day file noting. 5.status and progress report on action taken on my letters dtd.27/09/21 and 15/11/21. 6.any other information with respect to the above.*"

तद्नंतर तक्रारकर्ता यांनी प्रथम अपिलीय प्राधिकारी यांचेकडे कलम १९ (१) अन्वये प्रथम अपील दाखल केले.

तक्रारकर्ता यांनी दाखल केलेल्या प्रथम अपीलावर तत्कालीन प्रथम अपीलीय प्राधिकारी यांनी सुनावणी घेऊन दि.२८/२/२०२२ रोजी, "*जन माहिती अधिकारी तथा सह जिल्हा निबंधक वर्ग-२ ठाणे शहर यांनी अपिलार्थी यांना मागणी केलेली मुद्दा क्र.२ ची माहिती १५ दिवसात पुरविण्यात यावी.*" असा निर्णय दिलेला आहे.

सह जिल्हा निबंधक वर्ग-१ तथा मुद्रांक जिल्हाधिकारी ठाणे शहर यांनी दि.४/१२/२०२५ रोजीच्या पत्रान्वये विनंती केली की, विद्यमान जन माहिती अधिकारी तथा सह जिल्हा निबंधक वर्ग-२ ठाणे शहर हे रजेवर असल्याकारणाने तसेच तत्कालिन जन माहिती अधिकारी तथा सह जिल्हा निबंधक वर्ग-२ ठाणे शहर यांना सदर सुनावणीबाबत अवगत करणे होणे असल्याने विषयांकित प्रकरणी कृपया सुनावणीसाठी पुढील तारीख मिळणेस विनंती आहे.

सह जिल्हा निबंधक वर्ग-१ तथा मुद्रांक जिल्हाधिकारी ठाणे शहर यांची विनंती मान्य करण्यात येत आहे. प्रस्तुत प्रकरण सुनावणीकरिता पुढील तारखेस ठेवण्यात येत आहे.

यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

१. पुढील सुनावणीस तक्रारकर्ता, तत्कालिन जन माहिती अधिकारी व विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी उपस्थित रहावे.

२. प्रस्तुत प्रकरणाची पुढील सुनावणी दि.१३/१/२०२६ रोजी दुपारी २.०० वाजता होईल.

(शेखर चन्ने)
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : ४ डिसेंबर, २०२५ .